# प्रेस नोट ०२/०४/२०१९

०३

**मौजमजेसाठी महागडया सायकल चोरणाऱ्या अल्पवयीन बालकास येरवडा पोलीसांनी घेतले ताब्यात एकुण १,०२,०००/- रुपयांच्या १० सायकली जप्त-**

दिनांक ०१/०४/२०१९ रोजी येरवडा पोलीस स्टेशनच्या हददीमध्ये दाखल गुन्हे उघडकीस आणण्याच्या अनुषंगाने येरवडा तपास पथकातील पोलीस उप निरीक्षक मंगेश भांगे, पोहवा/१०००४ मांजुळकर, पोशि/सकट हे पेट्रोलिंग करीत असताना त्यांना त्यांचे गोपनिय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, येरवडा पोलीस स्टेशनच्या हददीमध्ये काही अल्पवयीन मुले हि त्यांचे मौजमजेकरीता सोसायटयांमधुन महागडया सायकली चोरी करीत असुन त्यापैकी एक अप्लवयीन मुलगा हा सध्या गुंजन टॉकीज चौकात सायकल घेवुन उभा आहे. मिळाले बातमीच्या अनुषांगाने येरवडा पोलीस स्टेशनच्या तपास पथकाने सदर अल्पवयीन बालकास ताब्यात घेवुन त्याचेकडे चौकशी करता त्याने येरवडा, खडकी परीसरात महागडया सायकली चोरल्याचे कबुल केले. त्याचेकडुन एकुण १० सायकली जप्त करुन खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आणण्यात आलेले आहेत.

१) येरवडा पोलीस स्टेशन गु.र.नं.१८४/२०१९ भा.द.वि.क.३७९

२) येरवडा पोलीस स्टेशन गु.र.नं.३६७/२०१८ भा.द.वि.क.३७९

३) येरवडा पोलीस स्टेशन गु.र.नं.५३४/२०१८ भा.द.वि.क.३७९

४) खडकी पोलीस स्टेशन गु.र.नं.११५/२०१९ भा.द.वि.क.३७९

वरील प्रमाणे गुन्हे उघडकीस आणुन सदर विधिसंघर्षग्रस्त बालकाकडुन येरवडा तपास पथकाने आता पर्यंत विविध कंपनीच्या एकुण १० महागडया सायकली जप्त करुन एकुण ०१,०३,०००/- किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केलेला आहे.

सदर कामगिरी हि मा.अपर पोलीस आयुक्त पुर्व विभाग श्री सुनिल फुलारी,मा.पोलीस उप आयुक्त श्री प्रसाद अक्कानवरु,मा.सपोआ येरवडा विभाग श्री शिवाजी पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक येरवडा राजेंद्र कदम, पोनि (गुन्हे) अजय वाघमारे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक मंगेश भांगे, पोहवा/संदीप मांजुळकर,पोहवा/हणमंत जाधव,पोशि/सुनिल सकट,पोशि/पंकज मुसळे,पोशि/नागलोत,पोशि/परदेशी, पोशि/कुंवर यांनी केलेली आहे.

(राजेंद्र कदम)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
येरवडा पोलीस स्टेशन